" अंतरी पेटवू ज्ञानज्योत "

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.**

जा.क्र. उमवि/१२/अ.क्र./७३८९/९७.　　　　　दिनांक : २१.०८.१९९७.

प्रति,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या
सर्व कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे
मा. प्राचार्य,

वांसी...

विषय :- जून, १९९७ पासून लागू झालेल्या पदवी स्तरीय, प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य वर्गातील नविन अभ्यासक्रमाबाबत.

महोदय,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांना या पत्राद्वारे विदित करण्यात येते की; मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रथमवर्ष कला, विज्ञान व वाणिज्य वर्गातील विविध विषयांसाठी नविन सुधारित अभ्यासक्रम जून, १९९७ पासून लागू करण्यात आलेला आहे व सदरचा अभ्यासक्रम विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ४४/९७, दिनांक ९.५.९७, ४९/९७, दिनांक २९.५.९७, ५४/९७, दिनांक ९.६.९७, ५६/९७, दिनांक ११.७.९७ अन्वये आपणांस यापूर्वीच पाठविण्यात आलेले आहेत. परंतु बरेचशे महाविद्यालयांकडून सदर परिपत्रकात उल्लेख नसलेल्या इतर विषयांच्या अभ्यासक्रमाच्या संदर्भात विद्यापीठाकडे वेळोवेळी विचारणा होत आहे.

तदनुषंगाने मला प्राप्त झालेल्या आदेशावरुन कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या उपरोक्त परिपत्रकात नमूद केलेल्या विषयां व्यतिरिक्त खालील वर्गातील त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या विषयांसाठी संबंधित अधिकार मंडळाने नविन सुधारित अभ्यासक्रम तयार केलेला नसल्यामुळे सदर विषयांसाठी यापूर्वीचाच म्हणजे जुनाच अभ्यासक्रम चालू कायम ठेवण्यात आलेला आहे.

१] प्रथम वर्ष कला :- १] हिस्ट्री ऑफ सिव्हीलायझेशन.
२] समाजशास्त्र.
३] स्टॅटिस्टीकल टेक्निक्स्.
४] भाषा व अन्य विज्ञान विचार पद्धती.
५] शिक्षणशास्त्र.
६] कॉम्प्युटर.
७] नृत्यकला.

कृ. मा. प. . २/-

२] प्रथम वर्ष विज्ञान :- १] बायोकेमिस्ट्री.
२] मायक्रोबायोलॉजी.
३] जिओलॉजी.
४] कॉम्प्युटर

करिता, मा. प्राचार्य यांना विनंतीपूर्वक विदित करण्यात येते की; या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधित प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या नजरेस आणावा ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उप कुलसचिव.

प्रत माहितीसाठी सादर :

१] मा. परीक्षा नियंत्रक, उ.म.वि., जळगांव.

२] मा. उपकुलसचिव, परीक्षा [पूर्वार्ध/उत्तरार्ध] विभाग, शैक्षणिक विभाग, उ.म.वि., जळगांव.

३] मा. सहा. कुलसचिव, परीक्षा [पूर्वार्ध/उत्तरार्ध] विभाग, उ.म.वि., जळगांव.

४] मा. प्रोग्रामर, संगणक विभाग, उ.म.वि., जळगांव.

पी.३/x

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

जा.क्र. उमवि/१२/२६/अभ्र/ ४४५४ /९७

दिनांक :- ४.८.१९९७

"शुध्दीपत्र"

प्रति,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे मा.प्राचार्य

यांसी-

विषय :- प्रथमवर्ष विज्ञान जिऑलॉजी विषयाचा अभ्यासक्रम संबंधी.

संदर्भ :- विद्यापीठाचे पत्र क्र. उमवि/१२/अभ्र/४३८१/९७, दिनांक २९.७.९७.

महोदय,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे मा.प्राचार्य यांना यापत्राद्वारे विदित करण्यात येते की; प्रथमवर्ष कला, विज्ञान व वाणिज्य वर्गातील विविध विषयांसाठी जून, १९९७ पासून नविन सुधारित अभ्यासक्रम लागू करण्यात आलेला असून, सदरचे सुधारित अभ्यासक्रम विद्यापीठाचे विविध परिपत्रकांन्वये आपणास वेळोवेळी पाठविण्यात आलेले आहे. तथापी सदर वर्गातील काही विषयांसाठी संबंधित अधिकार मंडळाने नविन सुधारित अभ्यासक्रम तयार केलेला नसल्यामुळे उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये प्रथमवर्ष विज्ञान वर्गातील १] बायोकेमिस्ट्री, २] मायक्रोबायोलॉजी, ३] जिऑलॉजी ४] कॉम्प्युटर विषयांसाठी पूर्वीचा जुनाच अभ्यासक्रम कायम ठेवण्यात आला असल्याचे कळविण्यात आले आहे. परंतु वरील चार विषयांपैकी विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ४६/९७, जा.क्र. उमवि/६/१२/२६/अभ्र/२७२३, दिनांक ९.५.१९९७ अन्वये प्रथमवर्ष विज्ञान वर्गातील जिऑलॉजी विषयाचा नविन सुधारित अभ्यासक्रम पाठविण्यात आलेला असून, <u>अनवधानाने विद्यापीठाचे पत्र क्र. उमवि/१२/अभ्र/४३८१/९७, दिनांक २९.७.१९९७ मध्ये जिऑलॉजी विषयाचा उल्लेख केला गेला आहे.</u>

करिता, मा.प्राचार्य, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये यांना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, प्रथमवर्ष विज्ञान वर्गातील जिऑलॉजी विषयासाठी विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ४६/९७, दिनांक ९.५.९७ अन्वये पाठविलेला नविन सुधारित अभ्यासक्रमच जून, १९९७ पासून शिकविण्यात यावा. व यापत्राचा आशय सर्व संबंधित प्राध्यापक तसेच विद्यार्थी यांच्या नजरेस आणावा ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव.

१] मा.परीक्षा नियंत्रक, उमवि, जळगांव.

२] मा.उपकुलसचिव, परीक्षा-पूर्वार्ध/उत्तरार्ध विभाग, उमवि, जळगांव.

३] मा.सहा.कुलसचिव, परीक्षा-पूर्वार्ध/उत्तरार्ध विभाग, उमवि, जळगांव.

४] मा.प्रोग्रामर, संगणक विभाग, उमवि, जळगांव.

दुबारा./-